# अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २४२ /२०२४ दि. १३/११/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, अंबरनाथ** वाहतूक उपविभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने १४० अंबरनाथ (अ.जा.) **विधानसभा मतदारसंघाचे स्ट्रॉगरुम महात्मा गांधी विद्यालय, महात्मा गांधी चौक, अंबरनाथ पश्चिम येथे असुन सदर ठिकाणी दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. सदर स्ट्रॉगरुम हे कल्याण शहराकडुन बदलापुर शहराकडे जाणाऱ्या राज्य महामार्ग क्र. ७६ वर आहे.** मतमोजणी दरम्यान सर्व पक्षाचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते यांची मोठया प्रमाणात गर्दी होवुन परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद–** | १) बदलापुर कडुन अंबरनाथ शहरामधुन उल्हासनगर, कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना (अंबरनाथ रेल्वे स्टेशन येथे जाणारे रिक्षा व मोटार सायकल वगळुन ) **फॉरेस्ट** नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदर वाहने फॉरेस्ट नाका येथुन डाव्या बाजुने वळुन पुढे टी पॉईंट वैभव हॉटेल पुढे नेवाळी नाका मार्गे कल्याण व उल्हासनगर मार्गे ईच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | २) बदलापुर व अंबरनाथ मधुन अंबरनाथ रेल्वे स्टेशन येथे जाणाऱ्या मोटर सायकल व रिक्षा यांना **डी.एम.सी. चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदर वाहने डी.एम.सी. चौक येथुन डाव्या बाजुला वळण घेवुन अंबरनाथ पोलीस ठाणे पुढे पोलीस पेट्रोल पंप येथुन उजवे बाजुला वळण घेवुन अंबरनाथ रेल्वे स्टेशन येथे जातील. |
| **प्रवेश बंद–** | ३) उल्हासनगर येथुन मटका चौक मार्गे अंबरनाथ शहरामध्ये तसेच बदलापुर, कर्जत कडे येणारी जड अवजड वाहने यांना **साईबाबा मंदिर** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने उल्हासनगर येथुन श्रीराम चौक, चक्की नाका मार्गे डावे बाजुने वळुन पुढे नेवाळी नाका मार्गे बदलापुर व कर्जत या ईच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ४) उल्हासनगर येथुन मटका चौक मार्गे अंबरनाथ शहरामध्ये, अंबरनाथ रेल्वे स्टेशन तसेच बदलापुर, कर्जत कडे येणारी सर्व प्रकारची रिक्षा, मोटार सायकल व छोटे वाहने यांना **मटका चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदर वाहने मटका चौक येथुन उजव्या बाजुला वळण घेवुन हुतात्मा चौक मार्गे अंबरनाथ रेल्वे स्टेशन येथे जातील तसेच हुतात्मा चौकातुन लोकनगरी मार्गे वैभव हॉटेल पुढे डावे बाजुने वळन घेवुन अंबरनाथ तसेच बदलापुर व कर्जत मार्गे ईच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ५) अंबरनाथ रेल्वे स्टेशन पश्चिम कडुन महात्मा गांधी चौकाकडे येणाऱ्या ऑटोरिक्षा, मोटार सायकल व इतर सर्व प्रकारच्या वाहनांना **सुश्रुत हॉस्पिटल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | अ) अंबरनाथ रेल्वे स्टेशन पश्चिम सुश्रुत हॉस्पिटल मार्गे उजवीकडे छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट – पाटील पेट्रोलपंप डावीकडे – डि.एम.सी. चौक मार्गे ईच्छीत स्थळी जातील.<br>ब) अंबरनाथ रेल्वे स्टेशन – डि.एम.सी. कंपनीचे मागील बाजुकडील रोड पुढे जावुन डावीकडे ग्लोबल बिजनेस पार्ककडे कल्याण – बदलापुर रोडकडे निघणारा रोड वरून ईच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ६) वैभव हॉटेल येथुन लोकनगरी मार्गे मटका चौक या दिशेने येणारी जड अवजड वाहने यांना **वैभव हॉटेल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची जड अवजड वाहने वैभव हॉटेल पासुन पुढे सुदामा हॉटेल मार्गे फॉरेस्ट नाका तसेच वैभव हॉटेल कडुन नेवाळी नाका मार्गे ईच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ७) वैभव हॉटेल येथुन लोकनगरी मार्गे अंबरनाथ पश्चिम रेल्वे स्टेशन या दिशेने येणारी सर्व प्रकारच्या वाहनांना मटका चौक "प्रवेश बंद" करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची छोटी वाहने वैभव हॉटेल पासुन पुढे सुदामा हॉटेल मार्गे फॉरेस्ट नाका मार्गे ईच्छीत स्थळी जातील. |

CS CamScanner

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक २३/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० पासुन ते रात्रौ २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व निवडणुकीची वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>

मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर

मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर

मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रतः– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.</u>

२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner